मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थकबाकीदारांना मालमत्ता कर भरण्यासाठी 5 मार्चपर्यंत मुदत

## थकबाकी न भरल्यास मालमत्तांचा लिलाव : थकबाकी असलेल्या 877 मालमत्ता लाखबंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने थकबाकी असलेल्या ५२० मालमत्तांचा लिलाव जाहीर केला आहे. थकबाकीदारांना थकबाकी भरण्यासाठी पाच मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतीमध्ये थकबाकी न भरल्यास मालमत्तांचा लिलाव करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

करसंकलन विभागाकडून जप्ती मोहीम डिसेंबर २०२४ पासून तीव्र करण्यात आली. थकबाकी असलेल्या ८७७ मालमत्ता लाखबंद (सील) करून जप्त करण्यात आल्या. त्यात बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र अशा मालमत्तांचा समावेश आहे. आतापर्यंत ३५७ मालमत्ताधारकांनी थकबाकी भरली आहे. या मालमत्तांची लाखबंदीची कारवाई मागे घेण्यात आली आहे. उर्वरित ५२० मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे. थकबाकीदारांना देयक भरण्यासाठी पाच मार्चपर्यंत अंतिम मुदत दिली आहे. जे कराचा भरणा करणार नाहीत, अशा मालमत्ताकरावर अधिकचा १५ टक्के लिलाव खर्च लावण्यात येणार आहे.

प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया सुरू झाल्यानंतर मालमत्ताधारकांना लिलावातून वाचवण्यासाठी मर्यादित संधी असणार आहे. मालमत्ताधारकांनी लिलावाची जाहीर सूचना प्रसिद्ध होईपर्यंत तत्काळ संपूर्ण थकीत कराचा भरणा करून लिलावप्रक्रिया टाळावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी केले आहे.




### थकबाकीदारांच्या मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया सुरु

» शहरामध्ये मालमत्ताकराची थकबाकी असणाऱ्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरु असून तात्काळ कर भरुन जप्तीची कारवाई टाळण्याचे आवाहन वारंवार करण्यात येत आहे. जप्त केलेल्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. ज्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत अशा मालमत्ताधारकांनी थकीत कराचा संपूर्ण भरणा पाच मार्च २०२५ पूर्वी करुन आपल्या मालमत्तेचा लिलाव टाळावा, असेही आवाहन जांभळे यांनी केले.

---

# भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पाच्या खर्चात वाढ

## अडथळा ठरणारे 300 उच्चदाब खांब हलविणार : त्यामुळे खर्चात तीन कोटींनी वाढ होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे काम संथगतीने सुरू असताना कामाच्या खर्चातही विविध कारणांमुळे वाढ होत आहे. जलवाहिनी टाकण्याच्या कामाला अडथळा ठरणारे उच्चदाब वीज खांब हलविण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने तीन कोटी चार लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे खर्चात तीन कोटींनी वाढ होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या पाहता महापालिकेने आंद्रातून १०० आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन केले. धरणातून जलवाहिनीद्वारे पाणी आणण्यासाठी महापालिकेने २०२० मध्ये निविदा प्रक्रिया राबवून जलवाहिनी टाकण्याचे काम ऑफशोअर इंडिया लि. या ठेकेदाराला दिले. या कामाची चार वर्षांची मुदत संपली, तरी हे काम अपूर्णच आहे. या जलवाहिनीचे काम ५० टक्केच पूर्ण झाले आहे. नवलाख उंब्रेपासून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकण्यात येत आहे. जलवाहिनीचे संपूर्ण काम १६२ कोटी रुपयांचे आहे. याचा कार्यारंभ आदेश १५ डिसेंबर २०२० रोजी दिला होता. कामाची मुदत १५ डिसेंबर २०२४ अशी चार वर्षांची होती. मात्र, या मुदतीत १९ किलोमीटरपैकी केवळ नऊ किलोमीटर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेतील जलवाहिनीला अडथळा ठरणारे उच्चदाब खांब हलविण्यात येणार आहेत. त्यासाठी सात दिवसांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे विद्युत विभागाचे सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले यांनी सांगितले.



### 300 उच्चदाब खांब हलविणार

» खेड येथील वाकीतर्फे वाडा येथील अशुद्ध जलउपसा केंद्रापासून इंदोरीपर्यंत जलवाहिनीच्या कामाला ३०० उच्चदाब खांब अडथळा ठरत आहेत. हे खांब हलविण्यासाठी महापालिकेने सात दिवसांच्या अल्पमुदतीची तीन कोटी चार लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. महावितरणच्या परवानगीनंतर शुल्क भरून हे काम हाती घेतले जाणार आहे. त्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागणार आहे.

# कात्रज, पेशवे, पाषाण तलाव होणार सुशोभित

## दोन कोटी रुपयांचा होणार खर्च : महापालिकेच्या प्रस्तावाला स्थायी समितीची मान्यता

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील तलावांच्या परिसरात नागरिकांना बसण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे, कारंजे बसविणे, रंगरंगोटी करणे यासह अन्य कामे करून ही ठिकाणे सुशोभित करण्यात येणार आहेत. त्यासाठी केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत दोन कोटी रुपयांचा निधी महापालिकेला मिळाला आहे. कात्रज, पेशवे, पाषाण आणि मॉडेल कॉलनीतील लकाकी तलावाचा यामध्ये समावेश आहे.

पुणे शहराला भरपूर निसर्गसंपदा लाभली आहे. टेकड्या, नदी, तलाव यामुळे शहराचे सौंदर्य उजळून निघते. पण गेल्या काही वर्षापासून नदी व तलावांच्या परिसरात वाढती बांधकामे व लोकसंख्या यामुळे पर्यावरणावर परिणाम झाला आहे.

तलावामध्ये थेट सांडपाणी येत असल्याने पाणी अशुद्ध झाले आहे, परिसरात दुर्गंधी निर्माण झाल्याने नागरिकांना त्रास होतो. तसेच तलावात अशुद्ध पाण्यामुळे जलपर्णी वाढत असल्याने ती काढण्यासाठी वर्षाला सुमारे एक कोटी रुपयांचा खर्च येत आहे.

या तलावात येणारे सांडपाणी रोखण्यासाठी या परिसरात सांडपाणी वाहिन्या टाकल्या जात आहेत. हे काम अजून पूर्ण झालेले नाही. महापालिकेतर्फे स्वच्छ भारत अभियानात सहभाग घेतला आहे. त्यात तलाव सुशोभीकरणासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता, त्यातून चार तलावांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.



घनकचरा व्यवस्थापन विभागाने यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. पाषाण तलावासाठी ४१ लाख ८८ हजार, कात्रज तलावासाठी ४१ लाख ८८ हजार आणि लकाकी तलावासाठी ४९ लाख ४२ हजार रुपयांच्या निविदा मंजूर झाल्या आहेत. तर पेशवे तलावासाठी ४९ लाख रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या प्रस्तावांना स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

### असे होणार सुशोभीकरण

- तलावातील पाण्यात कारंजे उभारणार, आकर्षक विद्युत रोषणाई करणार
- तलावाच्या लगत लाकडाची बाके बसविणार
- भिंतीचे रंगकाम केले जाणार
- तलावाच्या बाजूने नागरिकांना चालण्यासाठी पदपथ तयार केले जाणार
- तलावाला सीमा भिंत बांधणे
- हा परिसर कचरा मुक्त ठेवणार, कचरा टाकण्यांवर कारवाई

### तलावाचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना

- सांडपाण्यामुळे तलावातील पाणी दूषित झाले आहे, तेथे स्वच्छतेचे काम सुरु आहे.
- २०१७ मध्ये कात्रज तलावात येणारे सांडपाणी रोखण्यासाठी आराखडा
- दररोज दोन दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प
- केंद्र सरकारच्या अमृत योजनेतून तलाव स्वच्छ करण्यास मान्यता दिली होती.

# महापालिकेकडे असलेल्या मिळकती जाणार नगरपरिषदेकडे!

## उरुळी देवाची आणि फुरसुंगीतील सरकारी मिळकती देण्याचा प्रस्ताव मंजूर

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या आदेशानंतर स्वतंत्र नगर परिषद झालेल्या उरुळी देवाची आणि फुरसुंगी या गावांतील महापालिकेच्या मालकीच्या मिळकती सोडून इतर सर्व शासकीय मिळकती नगर परिषदेला परत केल्या जाणार आहेत. महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

पुणे शहराच्या हद्दीलगत असलेल्या उरुळी देवाची आणि फुरसुंगी या दोन गावांचा समावेश महापालिकेच्या हद्दीत २०१७ मध्ये करण्यात आला होता. ही गावे महापालिकेत आल्यानंतर तेथे आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यास महापालिकेने सुरुवात केली होती. या गावांमध्ये पूर्वी जिल्हा परिषद असल्याने गावांचा समावेश महापालिकेत झाल्यानंतर तेथील मालमत्ता महापालिकेच्या ताब्यात आल्या होत्या.



राज्य शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी ११ सप्टेंबर २०२४ रोजी आदेश काढत या गावांसाठी स्वतंत्र नगर परिषदेची स्थापना केली आहे. या नगर परिषदेचे काम तातडीने होणे शक्य नसल्याने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमत या गावांच्या विकासाचा रोडमॅप तयार करण्यात आला असून, पुढील सहा महिन्यांत टप्प्याटप्प्याने या सोयीसुविधा हस्तांतरित करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

त्यानुसार या नगर परिषदेच्या प्रशासकाकडून महापालिकेकडे ही गावे २०१७ मध्ये समाविष्ट झाली. त्या वेळच्या ग्रामपंचायतीच्या मालकी हक्काच्या इमारती, बखळ, बाजार, गाळे, तसेच इतर मिळकतींची माहिती मागविली होती.

या दोन्ही गावांमधून नागरी सुविधा क्षेत्र ताब्यात देण्याचीदेखील मागणी महापालिकेकडे करण्यात आलेली होती. त्यानुसार, या दोन्ही गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या ११६ मिळकती आणि आरक्षणापोटी ताब्यात आलेल्या १३ जागांची माहिती संकलित करण्यात आली. काही सेवा क्षेत्राच्या जागांवर महापालिकेने सुविधा केंद्रे सुरू केली आहेत. त्यानुसार, महापालिकेकडून या गावातील शासकीय मिळकती टप्प्याटप्प्याने नगर परिषदेकडे हस्तांतरित केल्या जाणार आहेत.

स्थायी समितीच्या बैठकीत याला मान्यता देण्यात आली. पहिल्या टप्प्यात दोन्ही ग्रामपंचायती महापालिकेत आल्या त्या वेळी ताब्यात घेतलेल्या मिळकती हस्तांतरित करणे, दुसऱ्या टप्प्यात सेवा क्षेत्र व रस्त्यांसाठी ताब्यात आलेल्या जागा, तर तिसऱ्या टप्प्यात ज्या मिळकतींमध्ये महापालिकेची नागरी सेवा केंद्रे आहेत, त्या जागा नगर परिषद प्रशासकांच्या ताब्यात देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# जप्त मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्याची अखेरची संधी

## कर आकारणी व कर संकलन विभागाकडून मालमत्ताधारकांना थकीत कर भरण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कर थकविणाऱ्या बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तांवर माहे डिसेंबर २०२४ ते माहे फेब्रुवारी २०२५ या दरम्यानच्या कालावधीत आज अखेर तब्बल ८७७ मालमत्ता जप्त केल्या आहेत. १० फेब्रुवारीपर्यंत जप्त करण्यात आलेल्या ७५९ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तापैकी ३२१ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्ताधारकांनी मालमत्ताकराची संपूर्ण थकीत रक्कम महानगरपालिकेकडे जमा केल्याने जप्त केलेल्या त्यांच्या मालमत्ता मुळ मालकाच्या ताब्यात देणेत आल्या आहेत.

उर्वरित ४३८ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्ताधारकांच्या मालमत्तेची यादी लिलावाचा भाग म्हणून दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजीचे दै.सकाळ, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. लोकमत, दै. लोकसत्ता, दै. आज का आनंद, दै. नवभारत टाईम्स, दै. प्रभात, दै. पुण्यनगरी, दै. सामना, दै. सिव्हिक मिरर अशा सर्व वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली. या यादीतील थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत थकीत कर भरण्याची संधी देण्यात आली होती. या संधीचा लाभ घेऊन ३६ मालमत्ताधाराकांनी थकीत कराचा संपूर्ण भरणा केला असून ३६ मालमत्ताधारकांनी आंशिक भरणा केला आहे. उर्वरित, मालमत्ताधारकांच्या मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया वेगाने सुरु करण्यात आली आहे. तथापि उपरोक्त प्रक्रियेस अजून ०५ दिवसांचा कालावधी जावयाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे थकीत मालमत्तांचे मालमत्ताधारकांना कराचा भरणा करण्यासाठी दि. ५ मार्च २०२५ रोजी पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. दिनांक ५ मार्च २०२५ पूर्वी जे मालमत्ताधारक संपूर्ण कराचा भऱणा करणार नाहीत अशा मालमत्ताकरावर अधिकचा १५ टक्के लिलाव खर्च लावण्यात येणार आहे. त्यामुळे दि. ५ मार्च २०२५ पर्यंत कराचा भरणा करावा अन्यथा सदर मालमत्तांचा महानगरपालिकेकडून दि. ५ मार्च २०२५ नंतर लिलाव करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जर सदर मालमत्ता लिलावामध्ये विकली गेली नाही तर १ रुपयाच्या नाममात्र बोलीवर महानगरपालिका सदर मालमत्ता खरेदी करणार आहे असे कर आकारणी व कर संकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

लिलाव प्रक्रियेमध्ये असणाऱ्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्तांच्या मालमत्ताधारकांनी थकीत कराचा आंशिक भरणा केला आहे, अशा मालमत्ता लिलाव प्रक्रियेतून वगळल्या जाणार नसून मालमत्तेचा लिलाव टाळण्यासाठी संपूर्ण थकीत कराचा भरणा करणे आवश्यक आहे, असेही करसंकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचबरोबर, लिलाव प्रक्रियेमध्ये असणाऱ्या मालमत्तेच्या थकीत करावर अधिकचे १५ टक्के लिलाव खर्चही जोडण्यात येणार असून यामुळे सदर मालमत्तेच्या कराच्या थकीत रकमेमध्ये सुध्दा वाढ होणार आहे. प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया सुरु झालेनंतर मालमत्ताधारकांना मालमत्ता लिलावातून वाचवणेसाठी अत्यंत मर्यादित संधी असल्याने, मालमत्ताधारकांनी लिलावाची जाहीर सूचना प्रसिद्ध होईपर्यंत तात्काळ संपूर्ण थकीत कराचा भऱणा करुन लिलावाची प्रक्रिया टाळावी. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.




> शहरामध्ये मालमत्ताकराची थकबाकी असणाऱ्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरु असून तात्काळ कर भरुन जप्तीची कारवाई टाळण्याचे आवाहन वारंवार करण्यात येत आहे. जप्त केलेल्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. ज्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत अशा मालमत्ताधारकांनी थकीत कराचा संपूर्ण भऱणा ५ मार्च २०२५ पूर्वी करुन आपल्या मालमत्तेचा लिलाव टाळावा.
>
> **- प्रदीप जाभंळे – पाटील, अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> शहरातील ८७७ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून यामध्ये ४०२ मालमत्ताचा लिलाव करण्यात येणार आहे. लिलावास पात्र मालमत्तांची यादी यापूर्वीच सर्व वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्यात आली असून त्यांना २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरण्यासाठी संधी देण्यात आली होती. लिलाव प्रक्रिया सुरू करणेत आली असून अंतिम संधी म्हणून ते ५ मार्च २०२५ पूर्वी मालमत्ता कर भरून लिलावद्वारे विक्रीची कटू कारवाई टाळू शकतात.
>
> **- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# पिंपरी चिंचवड शहरात 70 ठिकाणी जिजाऊ क्लिनिक

## महापालिका अग्निशामक दलाने शहरातील 570 नोंदणीकृत रुग्णालयांपैकी आत्तापर्यंत 403 रुग्णालयांना व्यवसाय अग्नीसुरक्षा प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी नोटिसा बजावल्या आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना, रुग्णांना वैद्यकीय सेवासुविधा उत्तम दर्जाच्या मिळाव्यात, म्हणून वैद्यकीय विभागाकडून विविध प्रकारची रुग्णालये आणि विभाग सुरू करण्यात येत आहेत. महापालिकेच्या सन 2025-26 च्या अर्थसंकल्पात वैद्यकीय सुविधांच्या सक्षमीकरणासाठी भरघोस तरतूद केली आहे. यामुळे 100 बेडचे कॅन्सर रुग्णालय, 30 बेडचे बर्न रुग्णालय, ट्रामा युनिट, डायलिसिस युनिट, प्लास्टिक सर्जरी विभाग, 250 बेडचे प्रसूती व बालरोग रुग्णालय उभारण्यास मोठी तरतूद केली आहे. तर शहरात 70 ठिकाणी शहरी आरोग्य केंद्र (जिजाऊ क्लिनिक) सुरू करण्यात येत आहेत.

वाढलेली महागाई, त्यात वैद्यकीय औषधोपचार व खर्च सर्वसामान्य रुग्णांच्या आवाक्याबाहेर गेला आहे. शहरात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरी भागातील सर्वसामान्यापासून मध्यमवर्गीय तसेच, गरजू नागरिक महापालिका रुग्णालयात उपचार घेत आहेत.

वैद्यकीय विभागाकडून नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी शहराच्या विविध भागांमध्ये 8 मोठी रुग्णालये, 27 दवाखाने, 20 आरोग्य केंद्र, 8 कुटुंब नियोजन केंद्र, 36 लसीकरण केंद्र आहेत. यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय हे 750 बेड क्षमतेचे सर्वांत मोठे रुग्णालय आहे. 400 बेडचे नवीन थेरगाव रुग्णालय, 100 बेडचे नवीन भोसरी रुग्णालय, 130 बेडचे नवीन आकुर्डी रुग्णालय आणि 120 बेडचे नवीन जिजामाता रुग्णालयांसह एक हजार 589 बेडची व्यवस्था महापालिकेच्या इतर रुग्णालयांत आहेत.

चिंचवड येथील नव्याने सुरू झालेल्या तालेरा अनेक प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. रुग्णालयात 250 बेडचे प्रसुतीकक्ष व बालरोग रुग्णालय सुरू होत आहे. या रुग्णालयात युरोलॉजी व प्लास्टिक सर्जरीसाठी विभाग सुरू करण्यात येणार आहे. महापालिकेच्या चार नवीन रुग्णालयांमध्ये डायलेसिस युनिट सुरु केले जाणार आहे. नवीन थेरगाव रुग्णालयात ट्रामा युनिट सुरु करण्यात येणार आहे. रूग्णालय व दवाखाने जवळ नसलेल्या भागांत एकूण 70 शहरी आरोग्य केंद्र सुरु करण्यात येत आहेत. मोशी येथे 700 बेडचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाची इमारती उभी करण्याचे काम सुरू आहे



### दोन रुग्णालयांत वैद्यकीय अभ्यासक्रम

» नवीन थेरगाव आणि नवीन भोसरी रुग्णालयात डीएनबीसाठी पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. तेथे विद्यार्थ्यांना स्त्रीरोग, बालरोग आणि भूलशास्त्र विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. या रुग्णालयांमध्ये औषध, कान, नाक घसा शस्त्रक्रिया, आर्थोपेडिक्स अभ्यासक्रमांसाठी परवानगी घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. आकुर्डी, नवीन जिजामाता, नवीन तालेरा रुग्णालयात स्त्रीरोग, बालरोग, भूलशास्त्र, औषधे, ईएनटी शस्त्रक्रिया, आर्थोपेडिक्स आदी डीएनबी अभ्यासक्रम सुरु करण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे.

# रसवंतिगृहांच्या घुंगरांचा आवाज वाढला

## बारामती शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागात सर्वत्र शीतपेयांसह उसाची रसवंती दुकाने सुरू झाली आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

यंदा फेब्रुवारीतच उन्हाचा तडाखा जाणवू लागला आहे. गेल्या आठ दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून, उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. परिणामी, बारामती शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागात सर्वत्र शीतपेयांसह उसाची रसवंती दुकाने सुरू झाली आहेत.

बर्फासह रसाचा ग्लास 20 रुपये, तर अननसासह 25 रुपयांना मिळत आहे. 20 रुपयांत फूल ग्लास रस मिळत असल्याने रसवंतिगृहामध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. याशिवाय शरीराला थंडावा देणारी कलिंगड, टरबुजालाही मागणी वाढली आहे. थंड पाणी, कोल्ड्रिंक्स, उसाचा रस, मठ्ठा, ताक, लस्सी, सरबत, विविध फळांचे ज्यूस, आईस्क्रीम, रसवंती, बर्फगोळा, कुल्फी, फळे, फळांच्या फोडी, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या फळांनी सजलेली दुकाने राज्यमार्गावर तसेच रिंगरोडवर दिसू लागली आहेत.



### चिंचबागा नेस्तनाबूद, विक्रेत्यांचे हाल

» बारामती शहरालगत निरा रस्त्यालगत शारदानगरजवळ आणि फलटण रस्त्यावर गवारफाटा येथे रस्त्यालगत डेरेदार चिंचबन होते. येथे उन्हाळ्यात 30 ते 40 रसवंतिगृहे चालवली जात होती. त्या माध्यमातून आर्थिक उलाढाल होत होती. परंतु, रस्त्यांच्या रुंदीकरणात येथील चिंचबन नष्ट झाले. परिणामी, रसवंतिगृहचालकांना आपली दुकाने अन्य ठिकाणी हलवावी लागली.

फेब्रुवारी-मार्च महिन्यात उन्हाचे चटके कमी जाणवत असतात. परंतु, यंदा लवकरच उन्हाचा तडाखा वाढल्याचे दिसून येत आहे. शहरातील बहुतांश हॉटेलमध्ये थंडपेय तसेच आईस्क्रीम पार्लरची दुकाने गर्दीने भरू लागली आहेत.

निरा-बारामती राज्यमार्ग तसेच इंदापूर, फलटण, भिगवण, मोरगाव आदी राज्यमार्गावर थाटलेल्या दुकानांतून विविध प्रकारचे सरबत उपलब्ध झाले आहेत. चॉकलेटशेक, कोल्ड कॉफी, लिंबू सरबत, रोझ मिल्कशेक, अननस, स्ट्रॉबेरी, चिकू, सफरचंद, संत्री या फळांच्या रसाची मागणी वाढली आहे. सर्व प्रकारचे रस 10 ते 60 रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. अन्य शीतपेयांच्या तुलनेत उसाचा रस स्वस्त आणि मस्त असल्याने त्याला या दिवसांत अधिक मागणी दिसून येते.

### थंडपेयांची मागणी वाढली

» उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होत असते. त्यामुळे शरीराला ऊर्जा आणि तहान भागविण्यासाठी आता सरबत, उसाचा रस, आईस्क्रीम, कुल्फी, लिंबू सरबत यांसारख्या थंडपेय पदार्थांची दुकाने थाटलेली दिसत आहेत. सध्या थंडपेयांची मागणी वाढली असून, दुकानदारांकडून ती ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मागील काही वर्षांपासून वातावरणात बदल झाल्याने अवेळी थंडी तर कधी उकाडा जाणवू लागला आहे. पूर्वी दरवर्षी मार्च, एप्रिल, मे महिन्यात उन्हाचा तडाखा बसत असे. आता मात्र फेब्रुवारीच्या सुरुवातीपासूनच कडक उन्हाच्या झळा नागरिकांना जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे सकाळी पडणारी थंडी, दुपारी लागणारी उन्हाची हीट आणि पुन्हा रात्री लागणारा गारवा असे दिवसभर सततच्या वातावरणातील बदलाचे चक्र फिरू लागल्याने ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांमध्ये आजारी पडण्याचे प्रमाण वाढत आहे. शिवाय उन्हाच्या तडख्यामुळे आतापासून कामानिमित्त किंवा जीवनावश्यक गोष्टींसाठी बाहेर पडणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली आहे. शिवाय या रखरखत्या उन्हामध्ये टोपी, गॉगल, मास्क वापरण्याचे प्रमाण वाढले आहे.

# बुलेटच्या कर्कश सायलेन्सरला आता वाहतूक पोलिसांचा 'फटका'; 13 सायलेंसर केले जप्त

## वाहतूक शाखेने स्वच्छ सुंदर हरित असलेल्या बारामती शहरात आता 'शांतता व सुव्यवस्था' राखण्यासाठी पुढाकार घेतला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक शाखेने स्वच्छ सुंदर हरित असलेल्या बारामती शहरात आता 'शांतता व सुव्यवस्था' राखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. कर्कश आणि मोठा फटाका आवाज असलेल्या बुलेट ताब्यात घेत त्यांचे सायलेंसर जाग्यावरच काढून कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. दोन दिवसात सुमारे १३ गाड्यांचे सायलेंसर जमा करून वाहतूक शाखेने दंडात्मक कारवाई केली आहे.



गेली अनेक महिन्यांपासून बारामती वाहतूक पोलिसांनी इथल्या अस्ताव्यस्त वाहतुकीला शिस्त घातली आहे. अनेक दंडात्मक कारवाया करत बेशिस्त वाहनचालकांचे मन परिवर्तन केले आहे. मात्र एवढे करूनही कायद्याचे आणि शिस्तीचे भान नसलेल्या टुकारांना शिस्त लावण्यासाठी वाहतूक पोलिसांना परिश्रम घ्यावे लागत आहे. सध्या शहरातील वेगवेगळ्या भागात आणि महाविद्यालय परिसरात तरुणांकडे काही चांगल्या लोकांकडे सुद्धा बुलेट गाड्या वापरण्याचे प्रमाण अधिक आहे.

मात्र या कंपनीने दिलेल्या या गाड्यांमध्ये मनाप्रमाणे हवा असा बदल करून या गाड्या 'मॉडिफाय' करण्याकडे टुकार तरुणांणा रस आहे. त्यामुळे कंपनीचे सायलेंसर काढून त्या जागी फटाका सायलेंसर टाकून ही वाहने शहरातील प्रत्येक रस्त्यावर मोठा आवाज काढत फिरतात. याचा नाहक त्रास लहान मुले, वयोवृद्ध, मुली, आजारी रुग्णांना होतो. याबाबत वाहतूक पोलिसांनी वेळोवेळी सूचना केल्या, दंडही केले मात्र टुकार तरुणांना याचा कसलाही फरक पडत नाही.

त्यामुळे अशा टूकारांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक शाखेने वेगळीच मोहीम हाती घेतली आहे. बारामती शहरातल्या चौका-चौकात नाकांबदी करून अशा बुलेटचे सायलेंसर जाग्यावरच काढून घेऊन किंवा ही वाहने थेट

> "वाहतूक शाखेकडून नागरिकांना वाहतूक नियमांबाबत वारंवार आवाहन केले जाते. प्रसंगी दंडात्मक कारवाई केली जाते, मात्र तरीही काही बेशिस्त टुकारांकडून नियमांची पायमल्ली केली जाते. परंतु आता नियम मोडणाऱ्यांविरोधात कडक मोहीम राबवली जाणार आहे. फटाका सायलेंसर लावून कुणी फिरताना दिसला तर किंवा त्रास देत असेल तर +919923630652 या क्रमांकावर संपर्क करा, गाडीचा नंबर कळवा,
>
> -चंद्रशेखर यादव, पोलिस निरीक्षक

वाहतूक शाखेच्या दालनात नेऊन त्यांचे सायलेंसर काढून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जात आहे. विशेष म्हणजे जोपर्यंत काढलेल्या फटाका सायलेंसरच्या जागी दुसरा विना आवाजाचा सायलेंसर जोपर्यंत बसवला जात नाही तोपर्यंत अशी वाहने ताब्यात दिली जात नाहीत.

शिकार भाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव पोलीस जवान सुधाकर जाधव रेश्मा काळे प्रदीप काळे स्वाती काजळे योगेश कातवारे जलद कृती दलाचे जवान अशोक मोरे शिवाजी बरकडे योगेश पळसे अजय आहेर हैदर जमादार सुदर्शन कदम सुभाष डोंबाळे प्रिया पावडे प्रियांका पोफळे श्रद्धा थोरात यांनी केली आहे. ही मोहीम पुढेही चालू ठेवण्यात येणार आहे.